महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: १८ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ३ ऑगस्ट २०२१ ते सोमवार ९ ऑगस्ट २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

# गणपती-दिवाळी यंदाही कोरोनाच्या सावटाखाली

## ऑक्टोबरमध्ये असेल भयंकर स्थिती, संशोधकांचा दावा



**मुंबई/नवी दिल्ली (योगेश होळंब):** कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेतून भारत देश अद्याप पुर्णपणे सावरला नाही. दुसऱ्या लाटेचं संकट संपत नाही, तोपर्यंत शास्त्रज्ञांनी तिसऱ्या लाटेचा इशारा दिला आहे. दुसऱ्या लाटेत भारताची झालेली वाईट अवस्था पाहता, तिसऱ्या लाटेत परिस्थिती कशी असेल, याची चिंता प्रशासनाला लागली आहे. ऑगस्ट महिन्यातच कोरोना विषाणूची तिसरी लाट येण्याची शक्यता शास्त्रज्ञांकडून वर्तवण्यात आली आहे. यामुळे देशात दिवसाला जवळपास एक लाखाहून अधिक रुग्ण आढळण्याची शक्यता आहे. बिकट परिस्थितीत हा आकडा अडीच लाख इतका वाढण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, ऑगस्ट महिन्यात सुरू झालेली कोरोना विषाणूची तिसरी लाट ऑक्टोबर महिन्यात अत्यंत भयंकर असू शकते. त्यामुळे यंदाही गणपती आणि दिवाळी कोरोना विषाणूच्या सावटाखाली असणार आहे. दुसऱ्या लाटेत आरोग्य यंत्रणेची झालेली अवस्था पाहता, तिसरी लाटेनंही असचं थैमान घातलं तर देशापुढे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. हैदराबाद आणि कानपूरच्या आयआयटीमधील संशोधक मथुकुमल्ली विद्यासागर आणि मनींद्र अग्रवाल यांनी याबाबतचं संशोधन केलं आहे. गणितीय मॉडेलचा वापर करून देशात कोरोना स्थिती काय असेल, याचा अंदाज त्यांनी वर्तवला आहे. रविवारी, भारतात ४१,८३१ जण नव्यानं कोरोनाबाधित आढळले आहेत. तर ५४१ जणांचा कोरोना विषाणूमुळे मृत्यू झाला आहे. रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, केंद्र सरकारनं केरळ, महाराष्ट्र आणि ईशान्य प्रदेशासह १० राज्यांना इशारा दिला आहे.

## दुकानाच्या वेळा रात्री ८ पर्यंत वाढणार, पण...

**मुंबई (राजेश गायकवाड)**-ज्या जिल्ह्यातील रुग्णसंख्या आटोक्यात आली आहे. तिथे दुकानाच्या वेळा रात्री ८ वाजेपर्यंत वाढवण्यात येणार आहेत. निर्बंधाबाबत आज, सायंकाळी निर्णय जाहीर करु, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगली येथे सांगितलं. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पूरग्रस्त सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी निर्बंध शिथिल होणार असल्याचे सांगितलं. तसेच, जिथे रुग्णसंख्या जास्त आहे, तिथे कठोर निर्णय घेतले जातील, असेही सांगायला मुख्यमंत्री



विसरले नाहीत. लोकलमध्ये तूर्तास सर्वांना प्रवेश देणं शक्य नाही, असेही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं आहे. पुढील टप्प्यात लोकलमध्ये सर्वांना प्रवेश देण्यावर विचार केला जाईल. पुढील काही दिवसांत निर्बंध शिथिल केले तर रस्त्यावर उतरु असा इशारा व्यापारी संघटनेनं दिला आहे, या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की अशा धमक्यांना मी घाबरत नाही. लोकांची सुरक्षा माझ्यासाठी महत्वाची आहे. जीव वाचवण्याचा वेळ येते तेव्हा आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजन तयार होत नाही. ती चिंता आम्हाला करावी लागते. तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्राने दिलेल्या सुचेनेनुसार कोरोनाचे नियम पाळावे लागतील. जुलै महिन्यात सांगली जिल्ह्यात अतिवृष्टी व महापुरामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांचे, शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. राज्यासमोर सध्या कोरोनाचे आणि पूरस्थितीचे संकट असले तरी मी पूरग्रस्तांना वाऱ्यावर सोडणार नाही.

## मनसे सोबत युतीचा निर्णय केंद्र सरकारशी बोलणी करुन घेणार, राज ठाकरेंची २-३ दिवसात भेट घेऊन चर्चा करणार -चंद्रकांत पाटील

**मुंबई (अलीहूसेन शेख)**- गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि भारतीय जनता पक्ष युतीच्या चर्चा सुरू आहेत. दरम्यान नाशिक दौऱ्यावर असताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि राज ठाकरे यांची भेट झाली होती. यानंतर या चर्चांना बळकटी मिळाली. मात्र राज ठाकरेंनी या चर्चा फक्त मीडियामध्येच सुरू असल्याचे म्हणत वृत्त खोडून काढले होते. मात्र आता यावर चंद्रकांत पाटलांनी पुन्हा भाष्य केले आहे. येत्या २-३ दिवसात राज ठाकरेंची भेट



घेणार असल्याचे ते म्हणाले. चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार परिषदेत याविषयावर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, 'परप्रांतीय बाबत राज ठाकरे यांच्या क्लिप मी ऐकली आहे. माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झाले आहे. याबाबत राज ठाकरे यांच्याशी २-३ दिवसात भेट घेऊन चर्चा करणार आहे. मनसे सोबत युतीचा निर्णय केंद्र सरकारशी बोलणी करून घेण्यात येईल' असे चंद्रकांत पाटील यावेळी म्हणाले आहेत.

## 'राज्याच्या मदतीसाठी तातडीने निधी मंजूर करा'; शिवसेना, राष्ट्रवादीची केंद्रीय अर्थमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई (विशाल पाटील)**- राज्यातील सत्ताधारी पक्ष असलेल्या शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदरांनी आज केंद्रीय अर्थमंत्र्यांची दिल्लीत भेट घेतली. महाराष्ट्रातील महापुराच्या संकटात विमा कंपन्यांनी व्यापाऱ्यांच छळ थांबवावा आणि राज्याच्या



मदतीसाठी केंद्राने तत्काळ निधी मंजूर करावा, अशा दोन मागण्या केंद्रीय अर्थमंत्र्यांना निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. राज्यावर महापुराचं संकट आल्यानंतर यामध्ये मनुष्यहानी बरोबरच मोठ्याप्रमाणवर मालमत्तेसह व्यापाऱ्यांच्या सामानचंही नुकसान झालं आहे. मात्र अशा परिस्थितीतही विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई तत्काळ देण्यासाठी चालढकल केली जात असल्याचे दिसून येत आहे. विमा कंपन्यांकडून व्यापाऱ्यांना काही अजब अटी घातल्या जात आहेत. जोपर्यंत विमा कंपन्यांचे तपासणी अधिकारी प्रत्यक्ष पाहणीसाठी येत नाहीत, तोपर्यंत व्यापाऱ्यांनी आपलं महापुराने नुकसान झालेलं सामान हलवू नये, असं सांगितलं जात आहे. एवढच नाही तर पूर्ण विम्याची रक्कम देखील व्यापाऱ्यांना मिळणार नसून, केवळ ७५ टक्के रक्कम मिळणार असल्याचं समोर येत आहे. याच्याच निषेधार्थ शिवसेनेचे सर्व खासदार संजय राऊत यांच्या नेतृत्वात आणि राष्ट्रवादीचे सुनिल तटकरे व सुप्रिया सुळे यांनी एकत्रितपणे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली आहे. यावेळी शिवसेना व राष्ट्रवादीच्या खासदारांकडून दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या, यामध्ये पहिली मागणी म्हणजे विमा कंपन्यांनी आता कुठलेही निकष न लावता तातडीने ५० टक्के रक्कम व्यापाऱ्यांना द्यावी आणि नंतर तपासणी करून उर्वरीत रक्कम द्यावी.

## लसीकरण झालेल्या नागरिकांना लोकल प्रवासाची परवानगी देण्याचा विचार करावा, उच्च न्यायालयाच्या ठाकरे सरकारला सूचना

**मुंबई**- राज्यातील कोरोनाची दुसरी लाट ही ओसरत चालली आहे. दरम्यान तिसरी लाट येण्याची शक्यता असल्यामुळे राज्यात पूर्णपणे निर्बंध शिथिल करण्यात आलेले नाहीत. दरम्यान मुंबईची लाइफलाइन लोकल



देखील बंद आहे. यामुळे मुंबईकरांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून लसीकरण केलेल्या लोकांना रेल्वे प्रवासाची मुभा देण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. आता उच्च न्यायालयाने ठाकरे सरकारला याविषयी सूचना दिल्या असल्याची माहिती आहे.

## थोडक्यात

### अदानी एअरपोर्ट नाम फलकाची शिवसेनेकडून तोडफोड

**मुंबई (प्रतिनिधी)**- मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाबाहेर लावण्यात आलेल्या अदानी नामफलकावरुन शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार राडा केला आहे. विमानतळावरील




या नामफलकाला विरोध करत त्याची तोडफोड करण्यात आली आहे. अदानी समुहाने गेल्या काही दिवसापूर्वी या विमानतळाचा ताबा घेतला आहे. त्यांनी मुख्य प्रवेशव्दारावर 'अदानी एअरपोर्ट' असे नामफलक लावले आहे. शिवसेनेचा या नामफलकाला विरोध असून या विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव असताना हे फलक का लावले? अशी विचारणा शिवसैनिकांकडून केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या भारतीय कामगार सेनेच्या कार्यकर्त्यांनी विमानतळावरील या नामफलकाची तोडफोड केली आहे. दरम्यान, ही घटना घडल्यानंतर येथील पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचा ताबा १३ जुलै रोजी अदानी समुहाकडे आला आहे. यापूर्वी हा ताबा जीव्हीके कंपनीकडे होता.

### मेट्रोला मंजुरी मोदींनी दिली, पैसे फडणवीसांनी आणले आणि ट्रायल रनला अजित पवार'

**पुणे (अभिजीत येरल्लू):** पुणे मेट्रोची पहिली औपचारिक 'ट्रायल रन' शनिवारी पहाटे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. भाजपच्या कोणत्याही मोठ्या नेत्याला या कार्यक्रमाचं आमंत्रण नव्हतं. तसंच, कार्यक्रमातील पोस्टरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटोही नव्हता. त्यावरून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत



पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पाटील यांनी मेट्रो कंपनीला थेट इशाराच दिला आहे.

पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुणे मेट्रो कंपनीचा पाटील यांनी यावेळी जाहीर निषेध केला. 'मेट्रो मोदी सरकारनं मंजूर केली. देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडून ११ हजार कोटींचा निधी मिळवून दिला आणि अजित पवारांनी फक्त ट्रायल रन घेतली. कार्यक्रमात पंतप्रधान मोदींचा साधा फोटो नाही. तुम्हाला सगळं फुकट हवं आहे का? माझ्या मतदारसंघात कार्यक्रम होऊनही मला आमंत्रण दिलं नाही.

## शरद पवारांकडून मुख्यमंत्र्यांचं कौतुक; भाजप म्हणतो...

**मुंबई (विशाल कारंडे):** बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या शुभारंभाच्या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं तोंडभरून कौतुक केलं. पवारांचं हे कौतुक भारतीय जनता पक्षाला फारसं रुचलेलं



नाही. पवारांनी नेमकं कशासाठी मुख्यमंत्र्यांचा कौतुक केलं, असा सवाल करत, भाजपनं मुख्यमंत्र्यांच्या अपयशाची यादीच जाहीर केली आहे. 'अलीकडं महाराष्ट्रावर सतत काहीना काही संकटं येत आहेत. अतिवृष्टीचं संकट मोठं आहे. हजारो घरांमध्ये पाणी शिरलं. होतं नव्हतं ते वाहून गेलं. या संकटावर मात करण्याची हिंमत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दाखवली. एकीकडे पूरग्रस्तांची घरं बांधण्याचं आव्हान तर दुसऱ्या बाजूस मुंबईतील कष्टकऱ्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वाचं पाऊल मुख्यमंत्र्यांनी उचललं आहे,' असं पवार काल म्हणाले होते. महाराष्ट्र भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी ट्वीट करत पवारांच्या या भाषणावर प्रतिक्रिया दिली आहे. 'गेले दीड वर्ष मुख्यमंत्र्यांच्या भाषणातील शाब्दिक खेळ, भावनिक आवाहनं आणि ड्रायव्हिंग हेच जनता पाहत आलीय. मुख्यमंत्री ठाकरे आता ज्या प्रकल्पांचा शुभारंभ करत आहेत, ते देवेंद्र फडणवीस यांनीच सुरू केले आहेत,' असं उपाध्ये यांनी म्हटलं आहे. उपाध्ये यांनी मुख्यमंत्र्यांच्या अपयशी कारकिर्दीची यादीच सादर केली आहे. 'करोनातील अपयश, मराठा आरक्षण टिकवण्यात अपयश, ओबीसी आरक्षण अपयश, पूरग्रस्तांना मदतीत अपयश, शेतकऱ्याना मदतीत अपयश...' अशी ही यादी आहे.

## महसूल विभाग शासन आणि जनता यामधील महत्वाचा दुवा, मंत्री उदय सामंत यांची प्रतिपादन

**मुंबई (नितीन देवळेकर)**- महसूल विभागाची नाळ ही शेतकरी तसेच ग्रामीण जनता यांच्याशी जोडलेली असल्याने हा विभाग शासन आणि जनता यामधील महत्वाचा दुवा आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले. आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसूल दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बी.एन.पाटील, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी दत्ता भडकवाड, प्रांताधिकारी विकास सूर्यवंशी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष उदय बने आदी मान्यवर उपस्थित होते. नैसर्गिक आपत्ती, निवडणूक अशा वेळी महसूल विभागातील कर्मचारी नेहमीच कार्यतत्पर असतात परंतु कोव्हीड महामारीच्या कालावधीत महसूलच्या कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याचे सामंत यांनी सांगितले. निसर्ग व तौक्ते चक्रीवादळ तसेच नुकत्याच झालेल्या पूरपरिस्थितीत कोतवालापासून ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत आपला जीव धोक्यात घालून महसूल विभागाने काम केले,



अशा शब्दात मंत्रीमहोदयांनी महसूल विभागाचा गौरव केला. मंत्री उदय सामंत यांनी महसूल दिनानिमित्त महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बी.एन.पाटील म्हणाले, महसूल विभाग हा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचणारे खाते आहे. कोणत्याही विभागाची कोणतीही योजना राबविण्यात महसूल विभागाचे सहकार्य असते. महसूल विभाग हा शासनाचा कणा आहे. आपल्याला वेगवेगळया माध्यमातून जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे आपल्याकडे येणाऱ्या नागरिकांचे प्रश्न सकारात्मक दृष्टिकोन ठेवून नियमात राहून व अभ्यासपूर्ण पध्दतीने सोडवा, असे आवाहन जिल्हाधिकारी पाटील यांनी कर्मचाऱ्यांना केले. आपल्या प्रास्ताविकात निवासी उपजिल्हाधिकारी दत्ता भडकवाड यांनी सांगितले, शासनाकडून येणाऱ्या नवनवीन योजना व प्रकल्पाचे नेतृत्व महसूल विभाग करते. कायदा सुव्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन, धान्य पुरवठा, जमिनीविषयक बाबी इत्यादी विविध कामे महसूल विभागामार्फत केली जातात. जिल्ह्यातील सातबारा संगणकीकरण पूर्ण झाल्याची माहितीही त्यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.

## खेडमध्ये महापुरानंतर डेंग्यूचे संकट, गाळ, चिखलामुळे डासांची उत्पत्ती

**खेड (सम्यक कासारे)**- महापुराच्या आसमानी संकटातून हळूहळू सावरण्याचा प्रयत्न करत असणाऱ्या खेडवासीयांना आता डेंग्यूचा सामना करावा लागत आहे. महापुरामुळे शहरात साचून राहिलेले पाणी, गाळ, चिखल यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती झाली असून खेड शहर आणि आजूबाजूच्या परिसरात डेंग्यूची साथ झपाट्याने पसरू लागली आहे. जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे खेड शहरालगत वाहणाऱ्या जगबुडी आणि नारिंगी या दोन्ही नद्यांना महापूर आला. पुराचे पाणी खेडच्या बाजारपेठेत आणि आजूबाजूच्या गावांमध्ये घुसल्याने हाहाकार उडाला. तीन दिवसांनंतर महापूर ओसरला, मात्र पूर ओसरल्यावर पूरग्रस्त भागात चिखल, गाळ आणि पाण्याची डबकी तयार झाली. महापुरात दुकानात पाणी शिरल्याने दुकानातील अन्नधान्य व इतर सामान कुजून गेले. त्यामुळे साफसफाईला सुरुवात झाल्यावर शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली. शहरात सगळीकडे पसरलेला चिखल, निर्माण झालेली डबकी यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती झाली. महापुरानंतर येणारी



संभाव्य रोगराई टाळण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने तत्काळ साफसफाईचे काम हाती घेतले. रोगराई पसरू नये यासाठी निर्मूलन मोहीम हाती घेण्याबरोबरच आरोग्य शिबिराचेही आयोजन केले, मात्र तरीही डेंग्यूने शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. रुग्णालयात येणाऱ्या दहा रुग्णांपैकी दोन रुग्ण कोविडचे तर ८ रुग्ण डेंग्यूचे आहेत.

## अनिल देशमुखांचे ईडीला पत्रःईडीची माझ्या विरोधातील कारवाई कायदा, सत्तेचा गैरवापर!

## सुप्रीम कोर्टात आधीच आव्हान दिल्याने चौकशीसाठी हजर राहणार नाही; अनिल देशमुखांनी जारी केले पत्र

**मुंबई (जसबीरकौर भामरा)**- १०० कोटी वसुली प्रकरणामुळे राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख हे अडचणीत सापडलेले आहेत. या प्रकरणी त्यांना सक्तवसुली संचालनायल म्हणजेच ईडीकडून समन्स बजावण्यात आला आहे. तसेच त्यांचा - मुलगा ऋृषीकेश यांना देखील समन्स बजावण्यात आला आहे. त्यांना आज सकाळी ११ वाजता मुंबईच्या कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. मात्र तिसऱ्या समन्सनंतरही अनिल देशमुख हे ईडीसमोर चौकशीसाठी हजर झाले नाहीत. अनिल देशमुख ईडी समोर आज सुद्धा उपस्थित राहणार नाही, त्यांच्या वतीने वकील इंदरपाल उपस्थित राहणार आहेत. याच अनुषंगाने अनिल देशमुख यांनी ईडीचा तपास अधिकाऱ्यांचे नावे एक पत्र जारी केले आहे. त्यानुसार त्यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून वकील इन्दरपाल बी सिंग हे उपस्थित राहतील असे पत्राद्वारे कळवले आहे. या पत्रामध्ये अनिल देशमुखांनी लिहिले की, ईडीची माझ्या विरोधातील कारवाई ही कायदा आणि सत्तेचा गैरवापर म्हणून करण्यात आली. मी सुप्रीम कोर्टात यापूर्वीच आव्हान दिले असल्याने चौकशीसाठी हजर राहणार नसल्याचे त्यांनी म्हटले. तसेच सुप्रीम कोर्टात त्यांच्या अर्जावर ३ ऑगस्टला सुनावणी होणार आहे. ३० जुलैला सुप्रीम कोर्टाने ३ ऑगस्ट ही तारीख देताच ईडीने सोमवारी समन्स जारी केला असे देशमुखांनी पत्रात लिहिले आहे. सरकारी तपास यंत्रणा आता आपला दिवसेंदिवस वाढवत असल्याचे दिसत आहे. १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणामध्ये सीबीआयने नुकतेच अनिल देशमुख यांच्याशी संबंधित असलेल्या १२ ठिकाणांवर नुकतीच छापेमारी केली होती. यामध्ये मुंबई, पुणे, नाशिक, सांगली व अहमदनगर येथील ठिकाणांचा समावेश होता. आता त्यांना ईडीकडून समन्स बजावण्यात आला आहे.





संपादक:- राकेश शंकर गोरे

# ऐका हाका, टाळा धोका

कोल्हापूर, सांगलीसह परिसरात वारंवार पूर येणे आणि त्यामध्ये जीवित वा मालमत्तेची हानी होणे सवयीचे झाले आहे. पण हे टाळता येईल का, यावर विचार व्हायला हवा. महापुरासारख्या आपत्ती काळात नुकसान टाळण्यासाठी आपण काय उपाय योजू शकतो, हे महत्त्वाचे आहे. जागतिक अभ्यासानुसार, आपत्ती टाळण्यासाठी जर एक रुपया वापरला तर प्रत्यक्ष आपत्तीवेळी ७ ते १५ पटीने होणारे नुकसान टाळता येते. नुकत्याच झालेल्या पावसाने महापूर, दरडी कोसळून अनेक जीव गेले, उद्योगधंदे बंद पडले. त्यानंतर कैक कुटुंबांची पाणी आणि वीज पुरवठ्याअभावी दयनीय अवस्था झाली. पुराने पसरणारी रोगराई आणि नुकसान टाळण्यासाठी योग्य नियोजन व जागरूकता नक्कीच उपयोगी आहे. कोल्हापूर आणि सांगलीत २०१९ मध्ये अशीच अवस्था झाली होती. आता २०२१मध्ये त्याचीच पुनरावृत्ती झाली आणि यापुढेही सातत्याने होतच राहणार आहे. याची कारणे ज्ञात असली तरी त्यांचा आढावा घेऊन त्यावर उपाय योजणे आवश्यक आहे.

हवामान बदलाचा झटका जगभरात खूप ठिकाणी बसतो आहे. जर्मनी व चीनमध्ये अतिवृष्टीने शेकडो लोक दगावले, अब्जावधींचे नुकसान झाले. अशी अतिवृष्टी होतच राहणार. ती टाळण्यासाठी आपल्याला राहणीमानात आणि नियोजनात काही बदल करावेच लागतील. विकासकामे करताना आपत्तीचे नवीन धोके निर्माण होणार नाहीत, याची काळजी घेणे अभिप्रेत आहे; अन्यथा भविष्यात आपल्याला कधीही न पाहिलेल्या आपत्तींना सामोरे जावे लागेल. उदाहरणार्थ, रस्ते बांधताना जर तो भाग उंच उचलून घेतला असेल तर योग्य रीतीने पाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्था करायलाच हवी. नाही तर पाणी साचून आसपासची शेती व गावे पुरामध्ये बुडतील आणि रस्तेपण तुटून वाहून जातील.

शहरी नियोजन करताना विविध गोष्टींचा विचार आवश्यक आहे. गेल्या २५-३० वर्षांत उपग्रहामार्फत अवकाशातून घेतलेल्या प्रतिमा आज उपलब्ध आहेत. कोल्हापूर, सांगलीसारख्या शहरांच्या अशा प्रतिमांचा अभ्यास करून शहर व आसपासचा कोणता भाग कधी आणि किती कालावधीसाठी पुराच्या पाण्याखाली जातो, हे सहजच समजते. त्याचे नकाशे बनवून त्यावर जर शहरातील पायाभूत सुविधा, घरांची स्थिती, तेथे राहणाऱ्या परिवारांची आर्थिक परिस्थिती इत्यादी अभ्यासले असता पुढील गोष्टी समजू



शकतात. १) कोणत्या भागात किती प्रमाणामध्ये पूर येतो. २) कुठल्या नागरिकांना आणि सुविधांना बाधा होऊ शकते? ३) कोणते भाग किती प्रमाणात असुरक्षित आहेत? या तिन्ही गोष्टी एकत्र तपासून त्यांचे वर्गीकरण करता येते. एकदा असे वर्गीकरण झाले, की मग त्या भागात अशी अवस्था का आहे, याची कारणमीमांसा करता येईल. एकदा का ही कारणे समजली, की पुढचे पाऊल म्हणजे त्याचे निवारण करण्यासाठी प्रयत्न करणे.

संभाव्य आपत्तीचे निवारण करण्यासाठी पुढीलप्रमाणे दूरदृष्टी आणि शास्त्रीय उपाययोजना गरजेच्या आहेत. १) नद्या आणि ओढे यांचे पात्र अडवून तेथे होणारी बांधकामे थांबवावीत. जेणेकरून पुराचे पाणी तुंबणार नाही. यामध्ये गुंतलेल्या राजकीय व व्यावसायिक व्यक्तींनी व ग्राहकांनीसुद्धा अशा बांधकामांना प्रोत्साहन देऊ नये. कारण भविष्यकाळात आपलेच नुकसान होणार आहे. २) प्रत्येक घर तसेच बहुमजली इमारती बांधताना आपत्कालीन व्यवस्थापनाच्या नियम-निर्बंधांचा त्यामध्ये समावेश करणे. अशा इमारती कोठे आणि कशा बांधावयाच्या, छतावरील पाणी जमिनीत मुरवण्याची व्यवस्था, किती भाग सिमेंट काँक्रिटने आच्छादावा आणि किती भाग उघडा ठेवून पाणी मुरण्यासाठी वापरावा, किती परिसर मोकळा व निसर्गाने आच्छादलेला असावा, याचे निकष अभ्यास करून ठरवावेत. त्यांची अंमलबजावणी तातडीने करावी. ३) पाण्याचा सहज निचरा होण्यासाठी करावी लागणारी कामे खूप दूरवरचा विचार करून करावीत. यामध्ये काही निर्णायक पायाभूत सुविधा कशा आहेत आणि त्यांचे व्यवस्थापन कसे करावे, याविषयी गंभीर विचार अनिवार्य आहे. कोल्हापुरात रंकाळा तलाव व पंचगंगेचे खोरे, सांगलीमध्ये कृष्णा नदीचे खोरे किंवा आसपासची धरणे यांचे सहकारात्मक आणि एकात्मिक व्यवस्थापन आवश्यक आहे. ४) आपसूकच पुढील मुद्दा येतो तो पूर्वइशाऱ्याचा. रात्रभर अचानक पाऊस कोसळून दुकानात, कारखान्यात, घरात पाणी घुसून मोठे नुकसान झाले. आज सर्वांकडे मोबाईल आणि विविध दूरचित्रवाणीवाहिन्या, हवामान खात्याचा अचूक अंदाज, पाटबंधारे विभागाकडे धरणाच्या पाण्याच्या पातळीची अचूक सूची आहे. हे सर्व असताना एक एसएमएस जर मिळाला, तरी नुकसान टाळता येते. हा प्रश्न केवळ तंत्रज्ञानाचा नसून नागरिक, सरकार आणि शास्त्र यांच्यातील समन्वयाचा आहे. या समन्वयासाठी योग्य प्रणाली बनवणे आणि तिचा वरचेवर सराव आवश्यक आहे. जेणेकरून आपत्ती काळात ही प्रणाली प्रभावीपणे वापरल्यास विविध विभागांचा समन्वय आपोआपच साधला जाईल.

महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन विभाग वेगवेगळ्या स्तरांवर कार्यरत आहे. त्यासाठी निधीही उपलब्ध आहे. आपत्तीपासून वाचण्यासाठी प्रारंभिक योजना करावयासाठी जिल्हा परिषद, महापालिका हा निधी वापरू शकतात. सोबत गरज आहे ती लोकसहभागाची आणि त्यांच्या प्रतिनिधींची. कारण ते बारकाईने प्रश्न मांडू शकतात. अंतरिक्षातून होणारे दूरस्थ संवेदन या भौगोलिक सूचना प्रणालीद्वारे थोडासा शास्त्रीय आधार त्याला पूरक ठरून त्यातून सुरक्षित शहर व वसाहती निर्माण होऊ शकतात. संभाव्य धोके टाळण्यासाठी आपण व आपले सरकार सक्षम आहे. हवे आहे ते फक्त नियोजन, समन्वय, शास्त्रीय अभ्यास आणि जनसामान्यांची आपले शहर, गावाविषयी दूरदृष्टी.

येथे नमूद सर्व उपाययोजनांना संयुक्त राष्ट्रसंघाचा आणि भारत सरकारचा पूर्ण आधार आहे. २०१५-२०३०' ही जगाने मान्य केलेली आपत्कालीन व्यवस्थापनाची रचना आहे, ज्यावर भारताची स्वाक्षरी आहे. पर्यायाने भारत सरकार 'एनडीआरएफ'च्या मदतीने, यातील सुचवलेल्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी कटिबद्ध आहे. यामध्ये चार प्रमुख गोष्टी नमूद केल्या आहेत. १) आपण राहतो तेथे आपत्तीचे धोके जाणणे. २) आपत्कालीन व्यवस्थापनासाठी लागणारी सरकारी यंत्रणा सर्व स्तरांवर कार्यरत करणे. ३) हे धोके कमी करण्यासाठी आवश्यक ती गुंतवणूक करणे. ४) आपत्ती आल्यास निवारणासाठीची आणि पुन्हा उभारून येण्यासाठी लागणारी क्षमता बळकट करणे. याचा उपयोग करून आपत्ती टाळण्यास वा दूर ठेवण्यास नक्की मदत होऊ शकते.

## भाईंदर खाडीपुलाची 'रखडपट्टी'

**वसई (गणेश बागडे):** भाईंदर आणि वसईला जोडणाऱ्या भाईंदर खाडीपुलाच्या कामाला आणखी विलंब लागण्याची शक्यता आहे. या पुलाच्या कामाच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झाले असून परवानग्या मिळाल्या आहेत मात्र अद्याप निविदा प्रक्रियेचे काम सुरू न झाल्यामुळे पुलाचे काम लांबणीवर पडणार आहे. यामुळे प्रकल्पाचा खर्च आणखी काही कोटींनी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वसई-विरार शहराला मुंबईशी जोडणाऱ्या भाईंदर खाडीवर एमएमआरडीएतर्फे सहा पदरी पूल बांधला जाणार आहे. २०१३ मध्ये या कामाला अंतिम मंजुरी मिळाली होती. हा पूल कांदळवन वनक्षेत्र आणि खारभूमीच्या मिठागरातून जाणार आहे. या कामासाठी एमएमआरडीएने 'मुंबई सागरी मंडळ' (एमएमबी), 'इनलँड वॉटरवेज अथॉरिटी ऑफ इंडिया' (आयडब्लूएआय) आणि 'महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण (एमसीझेडएमए) च्या परवानग्या मिळवल्या आहेत. एप्रिल महिन्यात खारभूमी विभागाने ९.८६ हेक्टर जागा देण्यास संमती दर्शवली होती. त्यामुळे पुलाच्या कामाचा अडथळा दूर झाला होता. त्यानंतर एमएमआरडीएने खारभूमी विभागाला या जागेच्या मोबदल्यात ३२ कोटी ४३ लाख रुपये देण्याचे मंजूर केले आहे. मात्र ही प्रक्रिया संथगतीने सुरू असल्याने प्रत्यक्ष कामाच्या निविदा निघालेल्या नाहीत. हे काम संथगतीने होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत एमएमआरडीएच्या जनसंपर्क विभागाकडून माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर एमएमआरडीएचे



प्रकल्पसहसंचालक भोसले यांनी वारंवार संपर्क साधूनही प्रतिसाद दिला नाही. या पुलाचे काम सप्टेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करणार असल्याचे यापूर्वीच एमएमआरडीएने सांगितले होते. वसई-विरार महापालिकेचे माजी महापौर आणि एमएमआरडीएचे माजी सदस्य नारायण मानकर यांनी या पूलाचे काम संथगतीने होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. नवघर माणिकपूर नगरपरिषद असताना या खाडी पुलाचा प्रस्ताव एमएमआरडीएकडे ठेवण्यात आला होता. तेव्हा पूलाचा खर्च ३०० कोटी होता. २०१८ पर्यंत तो अकराशे कोटींवर पोहोचला. अखेर २०१३ मध्ये एमएमआरडीएने या पुलाच्या कामाला मंजुरी दिली होती.त्यामुळे पूलाचा खर्च आता १५०० कोटींवर पोहोचला होता.

## मुंब्रा, दिव्यात कांदळवनावर घाला

**ठाणे (तृप्ती गोरे): मुंब्रा येथील देसाई खाडीत अतिसंवेदनशील खारफुटीची कत्तल झाल्याचा प्रकार अखेर तहसीलदार आणि वन विभागाच्या संयुक्त पाहणी अहवालातून उघड झाला आहे. करोनाची दुसरी लाट ऐन भरात असताना या भागातील भूमाफियांनी खाडीत भराव टाकून मुंब्रा ते दिवा असा दोन किलोमीटर अंतराचा रस्ता बांधल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या तहसीलदार आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी केली. या पाहणीत खारफुटीची सोनचिप्पी (सोन्नेरेशिया अपेटला) आणि तिवर (एव्हिसेंनिया मरिना) या अतिसंवेदनशील प्रजाती नष्ट झाल्याचे समोर आले आहे. तर करंजवेल या कांदळवनाच्या सहयोगी वेलींचेही अस्तित्वही भूमाफियांनी नष्ट केले आहे.**

ठाणे जिल्ह्यात पर्यावरणाचे अस्तित्व भूमाफिया आणि वाळूमाफियांमुळे धोक्यात आल्याची अनेक प्रकरणे गेल्या काही महिन्यांत पुढे आली आहेत. पुराच्या तसेच आपत्तीपासून रक्षण करणाऱ्या खाडीतील खारफुटींचे नष्ट करण्याचे काम तर वेगाने सुरू आहे. टाळेबंदीच्या काळात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भूमाफियांनी पर्यावरणाची मोठी हानी केली आहे. मुंब्रा येथील देसाई खाडीत भूमाफियांनी मुंब्रा येथील चुहा पूल ते दिवा येथील साबेगाव असा दोन किलोमीटर रस्ता तयार केला. त्यापूर्वी ठाणे तसेच आसपासच्या शहरांमध्ये पर्यावरणाच्या रक्षणासाठी सातत्याने क्रियाशील असलेले असंख्य कार्यकर्ते यासंबंधी आवाज उठवीत होते. तरीही



दोन किलोमीटरचा बेकायदा रस्ता तयार होईपर्यंत जिल्हा प्रशासन ढिम्म होते. यासंबंधी दबाव वाढू लागल्याने उशिराने जागे झालेल्या जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. तहसीलदार युवराज बांगर यांनी संबंधित जागा मालकाविरोधात नोटीस काढून उत्तर देण्याचे कळविले आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांना अभिप्राय देण्यास कळविले. त्यानंतर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी पाहणी केली. या ठिकाणी खाडीत १० हून अधिक फूट उंच राडारोड्याचा भराव टाकण्यात आल्याचे स्पष्ट झाले. तसेच याठिकाणी अतिसंवेदनशील अशा खारफुटींच्या प्रजातींपैकी सोनचिप्पी आणि तिवर ही खारफुटी नष्ट झाल्याचे आढळून आले.

## परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यांचा लशीविना खोळंबा

**वसई (आकाश कांबळे):** शिक्षण वा नोकरीकरिता परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यांचे प्राधान्याने लसीकरण करण्याची मोहीम सर्वत्र राबवली जात असताना वसई, विरार शहरांतील पात्र लाभार्थीच्या मार्गात मात्र अडथळे कायम आहेत. अशा लाभार्थीना




लस देण्यासाठी वसई-विरार महापालिकेचे एकच केंद्र सध्या कार्यरत आहे. या केंद्रावर लशीचा तुटवडा असल्याने परदेशी जाण्याचे नियोजन करणाऱ्यांना लस मिळत नाही. ज्या लाभार्थीची एक मात्रा पूर्ण झाली आहे, त्यांना दुसऱ्या मात्रेसाठी या केंद्रावर हेलपाटे मारावे लागत आहेत. पालिकेच्या या नियोजनशून्य कारभारामुळे परदेशात शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्यांचे शैक्षणिक वर्षच हुकण्याची चिन्हे आहेत. देशात कोव्हिशिल्ड लशीची दुसरी मात्रा ८४ दिवसांनंतर देण्यात येते. मात्र, विशेष बाब म्हणून परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यांना २८ दिवसांच्या अंतराने दुसरी मात्रा दिली जात आहे. परंतु, वसईत सध्या कोव्हिशिल्ड लशीची टंचाई असल्याने पहिली मात्रा घेतलेल्यांना दुसरी मात्रा मिळणेच कठीण बनले आहे. पालिकेतर्फे केवळ वसई पूर्वेकडील अग्रवाल रुग्णालयात परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोव्हिशिल्ड लस उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुळात पालिकेकडे लशीचा साठा कमी येतो. त्यामुळे ५० ते १०० असा साठा उपलब्ध करून दिला जातो. त्यांची लस मिळविण्यासाठी या केंद्रावर गर्दी होत असते. केंद्रावर लस उपलब्ध होताच पहाटे ४ वाजेपासून विद्यार्थी केंद्रावर रांगा लावत असतात.

## अनधिकृत बांधकामांना नव्या अधिनियमाचा आधार

**उल्हासनगर (सतिश सोनावणे):** धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी तसेच अनधिकृत बांधकामांना नियमाधीन करण्यासाठी राज्य शासनाने २००६ मध्ये केलेल्या अधिनियमाची अंमलबजावणी उल्हासनगर शहरात व्यवस्थित होत नसल्याने राज्य शासनाने या अधिनियमाच्या दुरुस्तीसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. त्यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने १० सदस्यीय समितीची घोषणा केली असून ही समिती १५ दिवसांत शासनाला शिफारशींसह अहवाल सादर करणार आहे. या अधिनियमात दुरुस्ती झाल्यास जिल्ह्यातील उल्हासनगर, मुंब्रा, भिवंडी शहरांतील अनधिकृत बांधकामांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. उल्हासनगर शहरातील ८५५ अनधिकृत बांधकामांचा प्रश्न उच्च न्यायालयात गेल्यानंतर राज्य शासनाने २००६ मध्ये अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणे अधिनियम २००६ नुसार जाहीर केले होते. मात्र अधिनियमातील काही तरतुदींमध्ये उल्हासनगरातील बहुतांश बांधकामे बसत नसल्याचे समोर आले. त्यामुळे मोजक्याच इमारतींची



प्रक्रिया होऊ शकली. या अधिनियमांमध्ये बांधकामांमध्ये वापरले जाणारे चटईक्षेत्र निर्देशांक, अनधिकृत बांधकामाप्रकरणी आकारली जाणारी दंडाची रक्कम, मालकी हक्क, मुद्रांक शुल्क, मानीव अभिहस्तांतर आणि त्यासाठीचा दंड अशांबाबत ज्या तरतुदी होत्या, त्या उल्हासनगर शहरातील बांधकामांना लागू न होणाऱ्या होत्या. त्यामुळे नियम जाहीर होऊन १५ वर्षे उलटली असली तरी शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न निकाली निघाला नव्हता. पुनर्बांधणी शक्य होत नसल्याने शेकडो इमारतींमध्ये लाखो नागरिक आजही धोकादायक परिस्थितीत वास्तव्यास आहेत. गेल्या काही महिन्यांत धोकादायक झालेल्या इमारतींचे स्लॅब कोसळून काही जणांना प्राण गमवावा लागल्यानंतर शासनाने या प्रकरणी दखल घेतली. ७ जुलै रोजी नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीत बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यात येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. चर्चेअंती एक उच्चस्तरीय समितीची घोषणा करण्यात आली होती. मंगळवारी अखेर या समितीचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

## घरांच्या किमतीत घट



**ठाणे (गणेश बागडे): वस्तू आणि सेवा कर, मुद्रांक शुल्कामधील सवलती, मंदीच्या सावटामुळे बांधकाम व्यावसायिकांनी आखलेल्या वेगवेगळ्या सवलत योजना यामुळे ठाणे, बदलापूर आणि डोंबिवली या शहरांमध्ये वर्षभरात घरांच्या किमतीमध्ये जवळपास पाच टक्क्यांची घट झाल्याचा दावा 'नाइट फ्रँक' या रिअल इस्टेट क्षेत्रातील घडामोडींची पहाणी करणाऱ्या संस्थेच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.**

करोना काळात घरांच्या विक्रीचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले असले तरी वेगवेगळ्या सवलतींच्या माध्यमातून अनेक बांधकाम व्यावसायिक अजूनही खरेदीदारांना आकृष्ट करण्याचा प्रयत्ना करत आहेत. या पाहणीनुसार, पूर्वी एक बेडरूम हॉल किचन (वन बीएचके) घरासाठी प्रयत्न करणाऱ्या मध्यमवर्गीयांनाही आता दोन बीएचके घरांची ओढ लागली असून तशी घरे उपलब्ध करून देण्यासाठी बांधकाम व्यावसायिक कमी क्षेत्रफळाची पण दोन शयनगृहे असलेल्या सदनिका उभारणीला महत्त्व देऊ लागले आहेत.

'नाइट फ्रँक' या कंपनीने नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणाच्या आधारे, घर खरेदी करणाऱ्यांना वस्तू आणि सेवा कर, मुद्रांक शुल्कामध्ये मिळणाऱ्या सवलती, घराची नोंदणी करताना देण्यात येणाऱ्या सूट, विविध योजना यांमुळे घरांच्या किमतीमध्ये घट झाल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. बदलापूरमध्ये सध्या २ हजार ७०० ते ३ हजार ५००, डोंबिवली ४ हजार ५०० ते ६ हजार, घोडबंदर येथे ६ हजार ते १० हजार आणि नौपाडा क्षेत्रात १४ हजार ते १८ हजार रुपये प्रति चौ. फूट इतकी घराची किंमत झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत नौपाडा क्षेत्रात सर्वाधिक पाच टक्के, त्यानंतर घोडबंदरमध्ये चार टक्के, बदलापूर दोन टक्के आणि डोंबिवली क्षेत्रात एका टक्क्याने घराच्या किमतींमध्ये घट झाल्याचे या अहवालामध्ये म्हटले आहे. तसेच करोनाकाळातही घरांची विक्री होत असल्याचे अहवालात म्हटले आहे.

करोनाच्या कालावधीमध्ये २०२० मध्ये मार्च महिन्यात टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे २०२० मधील जानेवारी ते मार्च या कालावधीत कळवा, मुंब्रा, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, भिवंडी आणि कर्जत या क्षेत्रात ४ हजार ७२५ नवे घरे बांधण्यात आली. तर ५ हजार ५४३ घरे विक्री झालेली होती.

## घराचे हप्ते भरण्यास आणखी मुदतवाढ द्या!

**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** सिडकोच्या महागृहनिर्मितीतील घरांचे हप्ते भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून ती आता चार दिवसांत संपणार आहे. मागील काही महिन्यांत घर मिळालेल्या लाभार्थीच्या उत्पनात तसेच देशाच्या एकूणच आर्थिक स्थितीत फारसा फरक पडलेला नाही. बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. त्यामुळे सिडकोने घरांचे उर्वरित हप्ते भरण्याची आणखी तीन महिने मुदतवाढ द्यावी अशी लाभार्थीची मागणी आहे.

सिडकोने एक जुलैपासून सर्व हप्ते भरलेल्या ग्राहकांना टप्प्याटप्प्याने घरांचा ताबा देण्यास सुरुवात केली आहे पण या घरातील अनेक अंतर्गत कामे अपूर्ण असून ग्राहकांच्या अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे या मुदतवाढीमुळे सिडकोलाही ही कामे करण्यास मुदत मिळणार आहे. सिडकोने तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी या पाच नोडमध्ये सुमारे २५ हजार घरांचे बांधकाम सुरू केले आहे. तेवढ्याच घरांची सोडत ऑक्टोबर २०१८ पासून काढण्यात आलेली आहे. यातील चार हजार घरांचा ताबा सिडको ऑक्टोबर २०२० मध्ये देणार होती, मात्र याच वर्षी मार्चमध्ये देशात करोनाचा कहर सुरू झाला. त्यामुळे सिडकोचे या



घरांचे बांधकाम ठप्प झाले आणि ऑक्टोबरमध्ये घरांचा ताबा देता आला नाही. त्यामुळे सिडकोने नंतर डिसेंबर २०२० ही मुदत दिली. तोपर्यंतही करोना स्थिती आटोक्यात न आल्याने ही मुदत नंतर मार्च २०२१ व त्यानंतर मे २०२१ अशी जाहीर करण्यात आली. मात्र यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सिडकोला जून व जुलैमध्ये ताबा देण्याचे लेखी आश्वासन द्यावे लागले. ते सिडकोने पाळले असून एक जुलैपासून टप्प्याटप्प्याने ताबा देण्यास सुरुवात केली आहे. मात्र ताबा देण्यात आलेल्या ग्राहकांची नाराजी असून घरातील अनेक कामे प्रलंबित असल्याच्या तक्रारी वाढू लागलेल्या आहेत.

वीज जोडणी, शौचालयातील अंतर्गत कामे, पाणी, कडी कोयंडे अशा छोट्या मोठ्या तक्रारी ग्राहक करू लागले आहेत. सिडकोने कोविड काळ पाहता या एक वर्षांत घरांचे हप्ते न भरणाऱ्या ग्राहकांचा दंड माफ केलेला आहे तर घराचा एकही हप्ता किंवा काही हप्ते प्रलंबित असलेल्या लाभार्थीना ३१ जुलै ही शेवटची मुदत ही रक्कम भरण्यास दिलेली आहे. ही मुदत आता चार दिवसांनी संपणार असून यानंतर हप्ते न भरणाऱ्या ग्राहकांचे घर रद्द करण्याची कारवाई सिडको करू शकणार आहे मात्र इतर काळापेक्षा हा काळ वेगळा असून ३१ जुलैपर्यंत हप्ता न भरणाऱ्या किंवा काही हप्ते शिल्लक असलेल्या लाभार्थीची आर्थिक स्थिती सुधारलेली आहे असे चित्र नाही. करोनाचे संकट आजही घोंघावत असून तिसऱ्या लाटेमुळे अनेकांच्या मनात भीती आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)



# नियमांच्या चौकटीत उत्सवाचे आयोजन: 'लालबागचा राजा'सह अनेक मंडळांचा निर्णय

**मुंबई (योगेश होळंब)-** लालबागचा राजा उत्सव मंडळाने यंदा करोनानियमांचे पालन करीत उत्सव साजरा करण्याचा निर्णय शनिवारी झालेल्या बैठकीनंतर जाहीर केला. त्यानंतर गेल्यावर्षी करोनाच्या प्रादुर्भावामुळे उत्सव रद्द करणाऱ्या इतर अनेक मंडळांनीही यंदा चोख नियोजनाद्वारे उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईच्या गणेशोत्सवाची ओळख असलेल्या लालबागचा राजा उत्सव मंडळ यावर्षी कोणता निर्णय घेणार याकडे सगळ्यांचेच लक्ष लागले होते. यंदा उत्सवात खंड पडू न देण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. देशभरातील भाविकांना यंदा ऑनलाइन पद्धतीने लालबागच्या राजाचे दर्शन घेता येणार आहे. त्यासाठीच्या नियोजनालाही मंडळाने सुरुवात केली आहे. मुंबईत १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. त्यापैकी अनेक मोठ्या मंडळांनी गेल्यावर्षी उत्सव रद्द केला होता किंवा दीड दिवसांमध्ये बाप्पाचे विसर्जन केले होते. पण यंदा बहुतांश सर्वच मंडळांमध्ये ११ दिवस उत्सवाची धामधूम पाहायला मिळणार हे आता स्पष्ट झाले आहे. सध्या करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे करोनानियमांचे पालन करीत उत्सव साजरा करण्याचा निर्णय मंडळे घेत आहेत ही आनंदाची बाब आहे. मुख्यमंत्री आम्हाला बैठकीसाठी वेळ देतील अशी अपेक्षा आहे. उत्सवाला अजून महिना आहे. त्यामुळे अधिक चांगल्या वातावरणात हा उत्सव कसा साजरा होईल. याविषयीची दिशा ठरवण्यासाठी ही चर्चा होणे आवश्यक असल्याचे बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष नरेश दहीबावकर यांनी सांगितले. समितीने आपल्या मागण्यांचे एक पत्र पुन्हा मुख्यमंत्री कार्यालयाला पाठवले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने होणारे अर्थकरणही खूप मोठे आहे. पण मूर्तिकारांच्या प्रश्नापासून ते या उत्सवाशी निगडीत इतर अनेकांचे व्यवसाय संकटात आले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याप्रश्नी लक्ष घालून ते सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी मंडळांकडून करण्यात येत आहे.

## राज्यातील पाऊसबळी ३०० वर

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** यंदा राज्यात अतिवृष्टी, पुरामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ३०० वर पोहोचली आहे. राज्यभरात १०० जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. २२ ते २४ जुलैदरम्यान कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात



झालेल्या अतिवृष्टीतील बळींची संख्या आता २१३ वर पोहोचली असून, अजूनही ८ जणांचा शोध लागलेला नाही. ५२ जण जखमी आहेत. अतिवृष्टीमुळे कोकणातील १२०५ गावांना फटका बसला असून, तेथील जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. गेल्या आठवड्यात कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यास अतिवृष्टी तसेच पुराचा मोठा फटका बसला होता. त्यावेळी रायगड आणि सातारा जिल्ह्यात दरडी कोसळून ७० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. सध्या या जिल्ह्यातील पाऊस कमी झाला असून, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरही ओसरू लागला आहे. सध्या पूरग्रस्त भागात मदतकार्य वेगात सुरू असून हळूहळू जनजीवन पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न होत असतानाच येत्या पाच दिवसांत पुन्हा याच भागांत अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाने दिल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. राज्य आपत्ती निवारण नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार गेल्या आठवड्यातीत अतिवृष्टीचा फटका दोन हजार ५५६ गावांना बसला आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ४११, सांगली १०४, सातारा ४१६, पुणे ४२०, रत्नागिरी ४८२, पालघर ३९६, रायगड २८५ गावांचा समावेश आहे. दरडी कोसळून तसेच पुरामुळे २१३ लोकांचा मृत्यू झाला असून ७४२ जनावरे आणि ६२ हजार कोंबड्यांचा मृत्यू झाला.

## मुंबई-पुणे रस्ताप्रवास आणखी वेगात

**मुंबई (सम्यक कासारे):** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रवास आणखी सुसाट आणि सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा (एमएमआरडीए)ने खोपोली ते कुसगाव दरम्यान नवीन मार्गिकेच्या बांधणीचे काम हाती घेतले आहे. २० ते २५ मिनिटांची बचत करणाऱ्या या नव्या मार्गिकेवरून प्रवास करण्यासाठी वाहनचालकांना थोडी प्रतीक्षा करावी लागेल. करोनामुळे या प्रकल्पाचे काम मंदावले होते. मात्र या कामाला वेग देण्यात आला असून आतापर्यंत २२ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे.

हा प्रकल्प आता डिसेंबर २०२२ ऐवजी जून २०२३ मध्ये पूर्ण होणार आहे. ६६९५.३७ कोटी रुपये खर्चाच्या या कामाला फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरवात झाली आहे. द्रुतगती मार्गामुळे मुंबई ते पुणे अंतर कमी झाले आहे. तर हे अंतर आणखी कमी करत प्रवास अधिक वेगात करण्यासाठी एमएसआरडीसीने खोपोली ते कुसगाव अशी १९.८० किमीच्या नवीन मार्गिकेचे काम हाती घेतले. फेब्रुवारी २०१९ मध्ये या कामाला दोन टप्प्यात सुरुवात करण्यात आली. या प्रकल्पाअंतर्गत खोपोली



ते कुसगाव दरम्यानचा मार्ग आता सहाऐवजी आठ पदरी होणार आहे. तर या नव्या मार्गात दोन बोगदेही बांधण्यात येत आहेत. यातील एक बोगदा १ ७५ किमीचा तर दुसरा ८.९२ किमी लांबीचा आहे. २१.४२रुंदीचे बोगदे असून देशातील सर्वाधिक रुंदीचे बोगदे असतील असा दावा केला जात आहे. ६६९५.३७ कोटी रुपये खर्च करत बांधण्यात येत असलेल्या प्रकल्पामुळे प्रवासाच्या वेळेत २० ते २५ मिनिटांची बचत होईल. तर प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. कारण नव्या मार्गिकेत घाट भाग कमी होणार असल्याने दरडी कोसळण्याची भीती दूर होणार आहे. आतापर्यंत एकूण प्रकल्पाचे काम २२ टक्के पूर्ण झाले. तर उर्वरित कामाला वेग देत पहिला टप्पा मार्च २०२३ मध्ये तर दुसरा टप्पा एप्रिल २०२३ मध्ये पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर जून २०२३ मध्ये ही नवीन मार्गिका वाहतूक सेवेत दाखल होईल आणि प्रवास आणखी वेगात होईल असे एका अधिकाऱ्याने सांगितले आहे. फेब्रुवारी २०१९ मध्ये दोन टप्प्यात प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आणि वर्षभरात देशात करोनाचा शिरकाव झाला. टाळेबंदी लागल्याने काम मंदावले. मजुरांची कमतरता निर्माण झाली. वर्षभर ही परिस्थिती होती.

## 'फोन टॅपिंग' सरकारच्या मंजुरीनेच!

**मुंबई (नितीन देवळेकर)-** पोलिसांच्या बदल्या आणि नियुक्त्यांतील भ्रष्टाचाराच्या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी राज्य सरकारच्या मंजुरीनंतरच काही महत्त्वाच्या व्यक्तींचे कॉल ध्वनिमुद्रित करण्यात आल्याचा दावा आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांच्यावतीने बुधवारी उच्च न्यायालयात करण्यात आला. तसेच आता आपल्याला बळीचा बकरा बनवले जात असल्याचा आरोपही त्यांच्यातर्फे करण्यात आला. 'फोन टॅपिंग'साठी शुक्ला यांनी तत्कालिन अतिरिक्त मुख्य सचिव सीताराम कुंटे यांची परवानगी घेतली होती. याबाबत सादर के लेल्या अहवालाची कुंटे यांनी दखल घेतली होती. तसेच त्यांनी शासनाला दिलेल्या अहवालात परवानगीविषयी नमूद केले होते. नंतर मात्र त्यांनी या प्रकरणी दिशाभूल केली, असा दावा शुक्ला यांच्यातर्फे करण्यात आला. गोपनीय माहिती उघड केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या सायबर शाखेने अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी शुक्ला यांनी अटकेपासून दिलासा मिळवण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती एस. एस. शिंदे आणि न्यायमूर्ती एन. जे. जमादार



यांच्या खंडपीठासमोर बुधवारी या प्रकरणी सुनावणी झाली. त्या वेळी राज्याच्या गुप्तचर विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत असताना पोलिस महासंचालकांनी काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या फोनवरील संभाषणावर पाळत ठेवण्याचे आदेश दिल्याचा दावा शुक्ला यांच्यातर्फे करण्यात आला. बदल्या व नियुक्त्यांतील भ्रष्टाचारात गुंतलेल्या आणि राजकीय संबंध असलेल्या दलालांच्या संभाषणाचा त्यात समावेश होता.

## पोलिसांनी दिलेल्या माहितीवर माध्यमांनी बातम्या केल्या तर बदनामी कशी?; हायकोर्टाचा शिल्पाला सवाल

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** अश्लील चित्रपट निर्मितीप्रकरणी पती राज कुंद्राला अटक झाल्यानंतर समाजमाध्यमे व संकेतस्थळांवरून मानहानीकारक माहिती प्रसिद्ध करण्यास मज्जाव करण्याच्या मागणीसाठी अभिनेत्री शिल्पा शेट्टीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेत शिल्पाने समाजमाध्यमांसह वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांना प्रतिवादी केले होते. राज कुंद्राचा जामीन अर्ज कनिष्ठ न्यायालयाने फेटाळल्यानंतर शिल्पाने ही याचिका केली होती. दरम्यान या याचिकेवर शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. माध्यमांमध्ये दिलेल्या बातम्या या



मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून मिळालेल्या माहितीवरून आहेत. त्याला आव्हान कसं दिलं जाऊ शकतं? तो बदनामीचा प्रकार कसा म्हटला जाऊ शकतो? हे म्हणजे शिल्पा शेट्टीविषयी काहीच बोलू नका, असं सांगण्यासारखं आहे. शिल्पा शेट्टी या सार्वजनिक जीवन जगत आहेत. त्यांच्याविषयीच्या बातम्यांमध्ये लोकांना स्वारस्य असते आणि माध्यमांनी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर राज कुंद्रा प्रकरणात झालेल्या चौकशीविषयी बातम्या प्रसिद्ध केल्या असतील तर त्याविषयी बदनामीचा दावा कसा होऊ शकतो?,' असा प्रश्न न्यायालयाने शिल्पा शेट्टीचे वकील ॲड. डॉ. बिरेंद्र सराफ यांना विचारला होता. हायकोर्टाने वकील ॲड. डॉ. बिरेंद्र सराफ यांना सांगितले की, तुमच्या अशीलच्या पतीविरोधात गुन्हा दाखल आहे आणि हे कोर्ट कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही. कोणीही आपला अशील असू शकतो, परंतु बदनामीसाठी कायदा आहे. वृत्तपत्रांचा खप वाढवण्यासाठी या प्रकरणाशी संबंधित वृत्त अधिक रंजक करून प्रसिद्ध केले जाते, त्यामुळे प्रतिवाद्यांना आपल्याविषयी चुकीचे आणि मानहानी करणारे वृत्त प्रसिद्ध करण्यापासून मज्जाव करण्याची मागणी शिल्पाने याचिकेत केली होती.

## मोनोरेलच्या स्थानकाच्या छतावर जाहिराती झळकणार

**मुंबई (विशाल पाटील)-** चेंबूर ते जेकब सर्कल मोनोरेल मार्गाकडे मुंबईकरांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे हा मार्ग तोट्यात चालत आहे. या पार्श्वभूमीवर महसूल वाढविण्यासाठी आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मोनोरेल स्थानकासह मार्गावरील इतर बांधकामाच्या छताची जागा जाहिरातीसाठी भाड्याने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नुकतीच एमएमआरडीएने निविदा मागवली आहे. चेंबूर ते जेकब सर्कलदरम्यानचा १९.५४ कि.मी. लांबीचा संपूर्ण मोनोरेल मार्ग वाहतूक सेवेत दाखल होऊन दोन वर्षे उलटून गेली. पण तरीही या मार्गावरील प्रवासी संख्या वाढताना दिसत नाही. या प्रकल्पाला प्रवाशांचा प्रतिसादच मिळत नसल्याने एमएमआरडीएला दिवसाला लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.



एकूणच हा मार्ग तोट्यात चालला असून या मार्गाला आर्थिक नुकसानातून बाहेर काढण्यासाठी विविध पर्याय एमएमआरडीएकडून पुढे आणले जात आहेत. त्यातूनच आता मोनो स्थानकातील छतासह मार्गावरील इतर ठिकाणच्या बांधकामातील छताची जागा जाहिरातीसाठी भाड्याने देण्यात येणार आहे. जेणेकरून यातून काही महसूल एमएमआरडीएला मिळेल, अशी अधिकाऱ्यांना अपेक्षा आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो १ मार्गावर मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड (एमएमओपीएल)कडून महसूल वाढविण्यासाठी असे अनेकविध पर्याय वापरले जात आहेत. तर जाहिरातीतून त्यांना वर्षाला ४० ते ५० कोटी रुपये महसूल मिळतो. याच धर्तीवर एमएमआरडीएने छताची जागाही आता जाहिरातीसाठी भाड्याने देण्याचा निर्णय घेतला आहे.

## परवडणाऱ्या घरांची प्रतीक्षा संपणार!

**मुंबई (अलीहूसेन शेख)- मुंबईकरांची मागील दोन वर्षांपासूनची म्हाडाच्या घरांच्या सोडतीची प्रतीक्षा आता लवकरच संपण्याची शक्यता आहे. कारण म्हाडाच्या मुंबई मंडळाने अखेर आता सोडत काढण्याची तयारी सुरू केली आहे. त्यानुसार अँटॉप हिलमधील ४५० आणि गोरेगाव पहाडी येथील २६८३ घरांसाठी २०२२ मध्ये सोडत काढण्याचा मुंबई मंडळाचा विचार आहे. तर घरांचा आकडा वाढवण्यासाठी ही मंडळाचे प्रयत्न सुरू आहेत.**

२००८ पासून २०१९ पर्यंत सलग १२ वर्षे निघणाऱ्या मुंबईतील सोडतीत मागील दोन वर्षांपासून खंड पडला आहे. मुंबईतील म्हाडाच्या घरांना मोठी मागणी असताना दोन वर्षांपासून सोडत निघालेली नसल्याने इच्छुकांची प्रतीक्षा वाढत चालली आहे. तर मुंबई मंडळाकडून मात्र सोडत काढण्याच्या दृष्टीने आणि घरे वाढविण्याच्यादृष्टीने मागील दोन वर्षांत प्रयत्न झाले नसल्याचे चित्र आहे. यासंदर्भातील एक वृत्त 'लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध झाले होते. यानंतर मात्र मुंबई मंडळातील अधिकाऱ्यांची धावपळ उडाली असून मंडळाने घरांची शोधाशोध सुरू केली आहे. तर २०२२ मध्ये निश्चितपणे मुंबईतील घरांसाठी सोडत काढण्याच्या दृ-ष्टीने तयारी सुरू असल्याची माहिती मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी योगेश म्हसे यांनी दिली आहे. अँटॉप हिलमधील ४५० आणि २६८३ घरांचा यात समावेश असेल. तर आणखी काही घरे वाढविण्यासाठीही आम्ही प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. गोरेगाव पहाडी बांगुरनगर येथे मुंबई मंडळाचा मोठा गृहप्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पात अत्यल्प गटातील १९४७ घरे बांधण्यात येत असून ३२० ते ३३०



चौ फुटांची ही घरे आहेत. २३ मजली ११ इमारतीत ही घरे असतील. तर अल्प गटातील ७३६ घरांचे काम सुरू असून ही घरे ४८० ते ५९० चौ फुटांची आहेत. २३ मजली चार टॉवरमध्ये ही घरे आहेत. त्याचवेळी अँटॉप हिल येथे संक्रमण शिबिराच्या माध्यमातून मुंबई मंडळाला सुमारे ४५० घरे उपलब्ध झाली असून ही घरे ३०० चौ फुटांची आहेत. एकूणच अँटॉप हिलमधील ४५० आणि २६८३ घरांचा पुढील वर्षांच्या सोडतीत असणार आहे असेही म्हसे यांनी सांगितले आहे. कोळे कल्याण, उन्नत नगर, बोरिवली, वांद्रे(खेरनगर), कन्नमवार नगर येथील घरे ही उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

## बेशिस्तांच्या यादीत मुंबईकर आघाडीवर

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** एक दिशा मार्ग किंवा विरुद्ध दिशेने वाहन चालविण्याच्या प्रकारांमुळे मोठ्या संख्येने अपघात होण्याची भीती वर्तविण्यात येत असून दिवसेंदिवस वाहनचालकांमधील बेदरकारपणा वाढत असल्याचे समोर आले आहे. अशा बेशिस्त वाहनचालकांच्या यादीत मुंबईकर आघाडीवरच असल्याचे महामार्ग पोलिसांनी सांगितले. गेल्या दीड वर्षामध्ये वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या मुंबईतील तब्बल ६९ हजार वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. त्यापाठोपाठ ठाणे, पुणे आणि नाशिकमध्येही विरुद्ध दिशेने वाहन चालवण्याचे प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. एकदिशा मार्ग असलेल्या रस्त्यांवर विरुद्ध दिशेने वाहन चालविण्यास परवानगी नाही. मात्र असे असतानाही अनेक जण विरुद्ध दिशेने भरधाव वेगात वाहन चालवून वाहतुकीला आणि पादचाऱ्यांना अडथळा निर्माण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या वाहनचालकांविरोधात कारवाई करूनही अशा प्रकारांना आळा बसलेला नाही. अखेर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकारांची



दखल घेतली आणि हा वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांविरोधात जास्तीत जास्त दंडाची कारवाई करण्याची सूचना केली होती.

अशा प्रकारे वाहतुकीचे नियम मोडल्याच्या जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२० आणि जानेवारी २०२१ ते जून २०२१ या कालावधीत दोन लाख ६४ हजार ३४७ प्रकरणांची नोंद झाली. या वाहनचालकांवर केलेल्या कारवाईतून २६ कोटी रुपयांहून अधिक दंड वसूल केल्याची माहिती महामार्ग वाहतूक पोलिसांकडून देण्यात आली. राज्यात सर्वाधिक कारवाई मुंबईत होत असून २०२० मध्ये ३३ हजार २८२ आणि २०२१ मध्ये ३५ हजार ८९३ प्रकरणे झाली आहेत. ठाण्यातही गेल्या वर्षी २५ हजार ३९४ आणि या वर्षी १० हजार ९५३ वाहनचालक जाळ्यात अडकले आहेत. गेल्या वर्षीपासून नाशिक शहरातही अवघ्या ८११, तर नागपूर शहरात ५ हजार ४०० पेक्षा अधिक बेशिस्त वाहनचालक वाहतूक पोलिसांच्या जाळ्यात अडकले आहेत. विरुद्ध दिशेने वाहन हाकणाऱ्या चालकांवर एक हजार रुपये इतका दंड आकारला जातो.

मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गावर मनाई असतानाही विरुद्ध दिशेने धोकादायकरीत्या प्रवास केला जात आहे. या मार्गावर मोठया प्रमाणात अपघात होत असतात.

## मुंबई, ठाण्यात निर्बंध शिथिल!

**मुंबई (राकेश गायकवाड)-** मुंबई, ठाण्यासह २५ जिल्ह्यांमधील करोना निर्बंध काही प्रमाणात शिथिल करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या जिल्ह्यांत दुकाने रात्री ८ पर्यंत खुली ठेवण्यास मुभा दिली जाणार असून, उपाहारगृहे आणि मॉल ५० टक्के क्षमतेने सुरू करण्यास परवानगी देण्यात येणार आहे. मात्र, रुग्णसंख्या जास्त असलेल्या पुण्यासह ११ जिल्ह्यांमध्ये निर्बंध कायम राहणार आहेत. करोनाचा संसर्ग कमी झाल्याने १ ऑगस्टपासून निर्बंध शिथिल करावेत, असा सूर बुधवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत उमटला होता. याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वैद्यकीय तज्ज्ञांचा समावेश असलेल्या कृतिदलाच्या सदस्यांशी गुरुवारी चर्चा के ली. निर्बंध काही प्रमाणात शिथिल करण्यावर सहमती झाली असून, येत्या एक-दोन दिवसांत नवा आदेश जारी केला जाईल, असे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी बैठकीनंतर सांगितले. स्तर-३ चे निर्बंध काही प्रमाणात शिथिल के ले जाणार आहेत.

राज्याचा रुग्णवाढीचा दर ०.११ टक्के असून, साप्ताहिक बाधितांचे प्रमाण ३.८ टक्के आहे. या दोन निकषांच्या आधारे राज्य सरासरीपेक्षा कमी रुग्णवाढ तसेच बाधितांचे प्रमाण



असलेल्या २५ जिल्ह्यांतील निर्बंध शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, लवकरच याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल, असे टोपे यांनी सांगितले. सर्वांना उपनगरी रेल्वेतून प्रवास करण्याची परवानगी देण्याची मागणी सर्वच क्षेत्रांतून जोर धरत आहे. लशीच्या दोन मात्रा घेतलेल्यांना तरी उपनगरी रेल्वेतून प्रवास करण्यास परवानगी द्यावी, असा आग्रह असून, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही गुरुवारी ही मागणी केली.

## पालिका कर्मचाऱ्यांना ५० लाखांचे करोना विमा कवच

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** राज्यातील क व ड वर्ग महापालिका तसेच नगरपंचायती व नगर परिषदा यामधील करोना कर्तव्य पार पाडताना मरण पावलेल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना ५० लाख रुपयांचे विमा कवच देण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. अ आणि ब वर्ग महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगपालिका तसेच सर्व नगर परिषदा व नगर पंचायती यांना ही योजना लागू राहील. त्याचप्रमाणे सफाई कर्मचारी, कंत्राटी व मानधन तत्त्वावरील बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांचा देखील यात समावेश करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सेंद्रीय प्रमाणीकरण यंत्रणेची स्थापना करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. जागतिक स्तरावर सेंद्रिय उत्पादनांना असणारी वाढती मागणी त्यांना मिळणारे अधिकचे दर व राज्यातील सेंद्रिय शेतीस अनुकूल असणारी परिस्थितीती विचारात घेता सेंद्रिय शेती उत्पादनास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यासाठी उत्पादनास प्रमाणिकरणाची आवश्यकता असते. मुंबईतील 'नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था' आणि नागपूरमधील 'प्रादेशिक कामगार संस्था' येथील अध्यापकीय पदांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याला बुधवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या संस्थांमधील सात अध्यापकीय पदांना १ जानेवारी, २०१६पासून सातव्या वेतन आयोगाची संरचना लागू होईल.



# ...तर त्याची मोठी किंमत मोजावी लागेल: संजय राऊतांनी दिला जाहीर इशारा

**मुंबई (योगेश होळंब)-** शिवसेना भवन तोडण्याची भाषा केल्यामुळे संतापलेल्या शिवसेना खासदार संजय राऊत यांनी भाजपावर जोरदार टीका केली आहे. प्रसाद लाड यांनी केलेल्या वक्तव्याचा समाचार घेताना संजय राऊत यांनी जर त्यांच्या खांद्यावरुन भाजपा बंदूक चालवत असेल तर मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा दिला आहे. ते दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी चुकीला माफी नाही असं सूचक विधानही केलं आहे.

'अशी विधानं करुन लोकांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपामध्येही या वक्तव्यावरुन नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. शिवसेना भवन ही फक्त एक इमारत नसून मुंबई, महाराष्ट्राची रक्षणकर्ता असलेली वास्तू आहे. जे स्थान



हुतात्मा स्मारकाला आहे, त्याच भावना लोक शिवसेना भवनाविषयी व्यक्त करतात. ती वास्तू बाळासाहेब ठाकरेंची आहे,' असं संजय राऊत म्हणाले आहे. 'मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे काल शिवसेना पक्षप्रमुख म्हणून बोलले की एक झापड दिली तर उठणार नाहीत. हे पक्षप्रमुखांचं वक्तव्य आहे. सामनातही आम्ही सांगितलं आहे. स्वत:च्या पायावर याल आणि खांद्यावर जावं लागेल. ज्यांनी अशी भाषा आणि घाणेरडा विचार केला त्यांचं काय झालं याच्या नोंदी इतिहासात आहेत,' असंही संजय राऊतांनी म्हटलं.

'हा भाजपाचा विचार आणि भूमिका असूच शकत नाही. काँग्रेस, आरपीआय, राष्ट्रवादी काँग्रेस कोणीही शिवसेना भवन, बाळासाहेबांबद्दल असं बोलणार नाही. आमच्यातल राजकीय मतभेद नक्कीच असतात जे आम्ही व्यासपीठांवर, मीडियामध्ये, निवडणुकांमध्ये व्यक्त करत असतो. शिवसेनेने आणि बाळासाहेबांनी मुंबई, महाराष्ट्राचे लढे लढले आहेत. शिवसेना भवनाने अनेक जखमा अंगावर घेतल्या आहेत. मुंबईतल्या बॉम्बस्फोटात दहशतवाद्यांना शिवसेना भवनाखाली बॉम्ब ठेवून उडवण्याचा प्रयत्न केला. अतिरेकी घुसण्याचा प्रयत्न झाला आहे. प्रखर राष्ट्रवादाचं प्रतिक असलेली ही इमारत आहे. ते तोडण्याची भाषा नतद्रष्टे आणि बाटगेच करु शकतात,' अशी टीका संजय राऊतांनी केली आहे.

## राज्यातील सुमारे २०० पोलिस निरीक्षकांचं 'प्रमोशन' लवकरच!
### PI उपनिरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या ५ ऑगस्टपर्यंत

**मुंबई (राकेश गायकवाड)-** राज्य पोलिस दलातील पोलिस निरीक्षक तसेच पोलिस उपनिरीक्षकांच्या बदल्या दि. ५ ऑगस्ट पर्यंत होणार आहेत. त्याबाबतचे संकेत पोलिस महासंचालक संजय पांडे यांनी दिले आहेत. सर्वांना विनंतीनुसारच पोस्टिंग देण्यात आले असून काही ठिकाणचे अपवाद वगळता (व्हॅकन्सी नसल्यामुळे) सर्वांनाच चॉईस पोस्टिंग देण्यात आले आहे. दरम्यान, सुमारे २०० पोलिस निरीक्षकांना सहाय्यक आयुक्तपदी बढती लवकरच मिळणार असून त्यासाठी ३ ऑगस्ट रोजी बैठक आहे. पदोन्नतीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांची समवर्गप्रमाणे बदली होणार आहे. पोलिस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलिस निरीक्षक, पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस आयुक्त आणि



इतर काही दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार आहेत. त्याबाबत स्वतः पोलीस महासंचालकांनी फेसबुकपेजवरून संकेत दिले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासुन असंख्य पोलिस निरीक्षक बढतीच्या प्रतिक्षेत होते. आता मात्र त्यामधील सुमारे २०० पोलिस निरीक्षकांना सहाय्यक आयुक्त (पोलिस उपाधिक्षक) पदी बढती मिळणार असल्याचे निश्चीत झाले आहे. काही सहाय्यक पोलिस निरीक्षकांना पोलिस निरीक्षकपदी देखील बढती मिळणार आहे. दरम्यान, पोलिस उपनिरीक्षक ते पोलिस निरीक्षक यांची दि. ५ ऑगस्ट रोजीपर्यंत सर्वसाधारण बदली होणार आहे हे आता स्पष्ट झाले आहे. सुमारे २०० पोलिस निरीक्षकांना सहाय्यक आयुक्तपदी बढती मिळणार असल्याने अनेक ठिकाणचे अधिकारी बदलले जाणार आहेत.

## मॅनेजरची नोकरी गेली, महिन्यापासून ओला कारचा ड्रायव्हर, भिवंडीत गाडीमध्येच गळा दाबून हत्या

**भिवंडी (अलीहूसेन शेख):** मुंबई-नाशिक महामार्गावर उभ्या असलेल्या एका कारमध्ये मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. ओला चालकाची गळा आवळून हत्या केल्याचं तपासादरम्यान समोर आलं. मयत ४२ वर्षीय व्यक्ती भिवंडीचा रहिवासी होता. मुंबई-नाशिक महामार्गावर भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावरील माणकोली नाका येथे एका कारमध्ये मृतदेह आढळला होता. महामार्गावरील माणकोली परिसरात उड्डाणपुलाच्या खाली उभ्या असलेल्या व्हॅगन आर कारच्या ड्रायव्हरचा हा मृतदेह होता. या घटनेची माहिती



स्थानिक नारपोली पोलिसांना समजताच त्यांनी घटनास्थळी जाऊन मृतदेहाची तपासणी केली. मृतदेहाच्या गळ्याभोवती आवळल्याचे व्रण दिसल्याने ही हत्या असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रभाकर पांडू गंजी वय ४२ वर्ष असे मयत व्यक्तीचे नाव असून तो पद्मा नगर – भिवंडी येथील रहिवासी आहे. यंत्रमाग कारखान्यात व्यवस्थापक म्हणून काम करत असताना लॉकडाऊनमुळे काम बंद झाले. त्यामुळे आर्थिक टंचाईतून सुटका करून घेण्यासाठी त्याने स्वतःच्या व्हॅगन आर कारला ओलामध्ये लावून घेतलं. स्वतःच ड्रायव्हर म्हणून त्याने मागील एक महिन्यापासून काम करण्यास सुरुवात केली होती. चालकाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना करत नारपोली पोलिसांनी अज्ञाता विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

## लोणावळयात पर्यटकांना दणका; पोलिसांकडून १ लाख ७५ हजारांची दंडवसुली

**पुणे (शकिल शेख)-** लोणावळा परिसरात वीकेंड लॉकडाऊनचे उल्लंघन करणाऱ्या पर्यटकांवर पोलिसांकडून मोठ्याप्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांत पोलिसांनी या भागात फिरण्यासाठी आलेल्या ३३४ पर्यटकांवर दंडात्मक कांचन धबधब्यावर आलेल्या ५७ जणांवर कारवाई करण्यात आली होती. च्याकडून २९ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पहिलीच कारवाई असल्याने केवळ दंडात्मक तरतूद करून सोडून देण्यात आले आहे. यापुढे सरसकट गुन्हे दाखल



कारवाई केली. या माध्यमातून शासनाला १ लाख ७५ हजाराचा महसूल मिळाला आहे. शनिवार आणि रविवारी या दोन दिवशी ही कारवाई करण्यात आली. वीकेंड लॉकडाऊन असल्याने लोणावळा पोलिसांनी जागोजागी नाकबंदी करत अनेक पर्यटकांना माघारी धाडले. काही दिवसांपूर्वीच पोलिसांनी पुण्यातील धबधबे आणि इतर पर्यटनस्थळांच्या परिसरातही अशीच कारवाई केली होती. जुन्नरमधील करण्यात येतील, असा इशारा जुन्नर पोलिसांनी दिला होता.

पुणे जिल्ह्यातल्या पुरंदर तालुक्यात झिका व्हायरसचा संसर्ग असलेला पहिला रुग्ण आढळून आल्याने त्यामुळे येथील आरोग्य विभागाच्या यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. बेलसर येथील एका ५० वर्षीय महिलेला झिका या विषाणूजन्य आजाराची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. महाराष्ट्रात झिका विषाणू आढळलेली ही पहिलाच रुग्ण आहे.

## दरडीतून बाळाला वाचवताना भिंत कोसळली, १४ वर्षांच्या धावपटूचा पाय कापण्याची वेळ, आर्थिक मदतीचं आवाहन

**मुंबई (योगेश होळंब)-** दरड कोसळताना दोन महिन्यांच्या बाळाला वाचवण्याच्या प्रयत्नात अंगावर भिंत कोसळल्याने चिमुरडी धावपटू गंभीर जखमी झाली. या दुखापतग्रस्त विद्यार्थिनीवर शस्त्रक्रियेनंतर गुडघ्यापासून खाली पाय कापण्याची वेळ आली. त्यामुळे तिच्या पुढील उपचारासाठी आणि कृत्रिम पाय बसवण्यासाठी आर्थिक मदत करण्याचं आवाहन केलं जात आहे. रायगड जिल्ह्यात दोन आठवड्यांपूर्वी गंभीर पूरस्थिती निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटनाही समोर आल्या. यावेळी पोलादपूर तालुक्यातील केवनाळे गावात १४ वर्षांच्या



साक्षी दाभेकर हिने धिटाईने दोन महिन्यांच्या मुलाचे प्राण वाचवले. मात्र भिंत अंगावर कोसळल्यामुळे साक्षी जबर जखमी झाली. साक्षीला तातडीने रायगडहून मुंबईत हलवण्यात आले. 'केईएम' रुग्णालयामध्ये तिच्या डाव्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली. यावेळी दुर्दैवाने तिचा पाय गुडघ्यापासून खाली कापावा लागला. तालुका स्तरावरील धावपटू विद्यार्थिनीचा पाय कापावा लागल्याने तिच्या भवितव्यावर सावट आलं. या मुलीची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची आहे. त्यामुळे पुढील उपचारासाठी लाखो रुपयांच्या खर्चाचं आव्हान कुटुंबीयांसमोर उभं राहिलं आहे. सरकारने तिच्या या शौर्याची दखल घ्यावी आणि तिला पुढील उपचारासाठी मदत करावी अशी कुटुंबियांची मागणी आहे.

१४ वर्षांची साक्षी दाभेकर धावपटू आहे. कबड्डी आणि खो खो हे क्रीडा प्रकार ती तालुका स्तरावर खेळते. पण आता तिला पाय गमवावा लागला. लेकीची परिस्थिती बघून त्यांना अश्रू अनावर होतात. त्यामुळे साक्षीला कृत्रिम पाय बसवण्यासाठी दाभेकर कुटुंबाला आर्थिक मदत करण्याचं आवाहन दानशूरांना केलं जात आहे.

## बलात्कार प्रकरणातील आरोपीसोबत आधी मैत्री, मग भेटण्यासाठी बोलवलं; महिला पोलिसानी अशी केली अटक

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** बलात्कार प्रकरणातील आरोपीला अटक करण्यासाठी पहिला पोलीस उपनिरीक्षकानं अनोखी पद्धत अवलंबली. तिनं आरोपीसोबत मैत्री करत त्याला तुरुंगात पोहोचवलं. एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी २४ वर्षीय आरोपीला पकडण्यासाठी दिल्ली पोलिसातील महिला पोलीस उपनिरीक्षकानं आधी या व्यक्तीसोबत सोशल मीडियावर मैत्री केली, नंतर त्याला मैत्रीच्या बहाण्यानं भेटण्यासाठी एका रेस्टॉरंटमध्ये बोलवत अटक केली. पीडितेनं



पोलिसांना सांगितलं, की काही महिन्यांपूर्वी ती आपल्या घराजवळ एका व्यक्तीला भेटली होती आणि यानंतर त्यांची मैत्री झाली. यानंतर दोघांनी एकमेकांसोबत शारीरिक संबंधही ठेवले, मात्र यानंतर आरोपी तिच्यापासून दूर जाऊ लागला. त्यानं मुलीला कधी आपला फोन नंबरही दिला नाही. अशात आरोपीचा शोध घेणं पोलिसांसाठी सोपं नव्हतं.

पीडितेच्या तक्रारीनंतर पोलीस उपनिरीक्षक प्रियंका सैनी यांनी प्रकरणाचा तपास सुरू केला. यानंतर फेसबुकवर त्या व्यक्तीला शोधण्यास सुरुवात केली. यासाठी एसआयनं एक नवीन अकाऊंट तयार केलं आणि यावरुन आरोपीला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून चॅट करण्यास सुरुवात केली. मैत्री होताच एसआयनं आरोपीला भेटण्यासाठी बोलावलं. ३१ जुलै रोजी आरोपी वारंवार भेटण्याची जागा बदलत राहिला, मात्र अखेर त्याला श्री माता मंदिर महावीर एन्क्लेव येथे अटक करण्यात आली.

## पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी भिवंडीच्या तरुणाचा सहयाद्री ते हिमालय २००० किमी पायी प्रवास!

**भिवंडी-** टेकडी किंवा डोंगर चढताना भल्याभल्यांना घाम फुटतो. मात्र भिवंडीचा तरुण पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी भरपावसात रायगड ते सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्ट सर करण्यासाठी पायी निघाला आहे. सिद्धार्थ गणाई असे तरुणाचे नाव असून त्याने रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीला अभिवादन करून प्रवासाला सुरुवात केली. भिवंडीतील वापगाव येथील मैत्रिकुल या मुलांच्या वसतिगृहात सिद्धार्थ राहतो. सिद्धार्थचे बालपण अत्यंत हलाखीत गेले. मात्र वडिलांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने दोन वर्षे त्याने अंधेरीच्या एका पुलाखाली आपले बालपण काढले. पाच वर्षांपूर्वी सह्याद्री सर करण्याचे स्वप्न त्याने पाहिले होते. घरच्या परिस्थितीमुळे ते पूर्ण करता आले नाही. मात्र आता कितीही संकट आले तरी मागे फिरायचे नाही, असा वसा घेत सह्याद्रीच्या दिशेने तो निघाला आहे. सिद्धार्थ जेव्हा पुढच्या प्रवासाला निघतो तेव्हा वाटेतील प्रत्येक व्यक्तीला 'एक झाड लावून उपक्रमात सहभागी व्हा, एक झाड माणुसकीचे, एक पाऊल परिवर्तनाचे' असा संदेश देतो. निसर्गाची होत चाललेली कत्तल आणि निसर्गाचा कोप याला आपणच जबाबदार आहोत. प्रयत्न करणारे पण आपणच आहोत.



ही परिस्थिती बदलण्यासाठी हा एक छोटा प्रयत्न करत असल्याची भावना सिद्धार्थने व्यक्त केली. या वेळी मार्गक्रमण करत असताना आपत्ती व्यवस्थापन ग्रुप शहापूर यांनी त्यास सुका मेवा व फळांची भेट दिली सिद्धार्थ दिवसाला ३५ ते ४० किलोमीटर अंतर पायी प्रवासाला निघतो. रायगडमधून सुरू केलेला पायी प्रवास ठाणे, नाशिकमार्गे मध्य प्रदेश राज्यातून जाणार आहे. 'सह्याद्री ते हिमालय' असा दोन हजार किलोमीटरचा पायी प्रवास ७० दिवसांत पूर्ण करण्याची इच्छा सिद्धार्थने व्यक्त केली.

## बंदी असूनही साताऱ्यात बैलगाडा शर्यतीचा धुराळा, लाखो रुपयांची उलाढाल, प्रशासन हातावर हात ठेऊन गप्प!

**सातारा (सम्यक कासारे):** राज्यात बैलगाडी शर्यतींवर बंदी आहे. तरी सुद्धा सातारा जिल्ह्यातील मायणी परिसरात सध्या बैलगाडी शर्यतींचा अक्षरशः धुराळा उडाला आहे. या शर्यतींवर बंदी असूनसुद्धा शेकडो लोकांच्या उपस्थितीमध्ये या शर्यती पार पडत आहेत. प्रशासन मात्र हातावर हात ठेऊन गप्प आहे.

राज्यावर कोरोनाचं संकट सुरु आहे. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी शासन प्रशासन विविध उपाययोजना राबवत आहे. राज्यातल्या अनेक शहरांत कोरोनाचे रुग्ण पुन्हा एकदा वाढत आहेत. साताऱ्यात तर कोरोनाचा प्रकोप सुरु आहे. मात्र, अशाही



काळात सातारकरांना कोरोनाचं गांभीर्य लक्षात आलेलं नाहीय. सर्व नियमांना धुडकावून साताऱ्यात बैल गाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आलं. विशेष म्हणजे बैल गाडी शर्यतीला उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. तरीदेखील ही शर्यत आयोजित करण्यात आली. या बैलगाडा शर्यतींमध्ये लाखो रुपयांची उलाढाल होत असताना प्रशासन मात्र आजून ढिम्मच आहे. एकीकडे सामान्य जनता लॉकडाऊनचे नियम काटेकोरपणे पाळत असताना दुसरीकडे अशा शर्यतींच्या माध्यमातून शेकडो लोकं एकत्र येऊन सर्व नियम पायदळी तुडवत आहेत. मायनीनजीक या बैलगाडा शर्यतीचं आयोजन केलं गेलं होतं. या दरम्यान मोठ्या प्रमाणात या शर्यतीत भाग घेण्यासाठी आणि शर्यत बघण्यासाठी अनेक लोक जमले होते. अनेक तास ही शर्यत सुरु होती.

## पुण्याच्या मांजरी खुर्दमध्ये तरूणावर तीक्ष्ण हत्याराने वार करून खून, प्रचंड खळबळ

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** मित्राचे हात उसने घेतलेले पैसे परत का करत नाही, असे विचारायला गेलेल्या तरुणावर तीक्ष्ण हत्याराने वार करुन खून करण्याचा प्रकार मांजरी खुर्द येथील स्मशानभूमीजवळ घडला. विकास लक्ष्मण सोनवणे वय ३१, रा. मांजरी खुर्द असे खुन झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी पाच जणांवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास




सानवणे हा इलेक्ट्रिशन म्हणून काम करत होते. आरोपींनी विकास याचा मित्र गायकवाड याच्याकडून हातउसने पैसे घेतले होते. आरोपी हे पैसे परत करत नसल्याने रविवारी सायंकाळी त्यांच्यात वाद झाला होता. त्यानंतर रात्री ११ वाजण्याच्या सुमारास विकास आरोपींच्या घरी गेला. त्यांना पैसे परत का करत नाही, अशी विचारणा केली. त्यावेळी आरोपींबरोबर वाद झाला. त्यातून पाच जणांनी विकासवर वार करुन त्याचा खुन केला. लोणीकंद पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मुंबईत नो किसिंग झोन:कपल्सच्या अश्लील चाळयांना कंटाळून मुंबईतील एका कॉलनीत स्थानिकांना लावावे लागले 'नो किसिंग झोन' चे फलक! लॉकडाउनमध्ये वाढली होती प्रकरणे

**मुंबई (विशाल कारंडे)-** मुंबईतील एका सोसायटीमध्ये पेन्ट करण्यात आलेले फलक सध्या चर्चेत आहे. या ठिकाणी एका सोसायटीतील लोकांनी आपल्या पार्किंगच्या जागी 'NO KISSING ZONE' (नो किसिंग झोन) असे ठळक अक्षरांमध्ये पेन्ट केले आहे. स्थानिकांच्या मते, या ठिकाणी येणाऱ्या रोजच्या प्रेमी युगुलांमुळे ते कंटाळले होते. लॉकडाउनच्या काळापासूनच या ठिकाणी कपल्स येण्यास सुरुवात झाली होती. त्यांना थांबवण्यासाठी सोसायटीने हा प्रयत्न केला आहे. सोसायटीतील नागरिकांनी सांगितल्याप्रमाणे, लॉकडाउनच्या काळात या सोसायटीच्या पार्किंगच्या जागेवर कपल येण्यास सुरुवात झाली. या ठिकाणी लावलेल्या वाहनांच्या आड कपल्स अश्लील चाळे करतात. गेल्या काही दिवसांपासून हा जनु हा कपल्सचा स्पॉट बनत होता. अशात जोडप्यांच्या अश्लील चाळ्यांना कंटाळून आम्ही हा फलक लावला असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

मुंबईतील बोरिवली येथे असलेल्या सत्यम शिवम सुंदरम सोसायटीमध्ये हा प्रकार घडला आहे. सोसायटीत राहणाऱ्यांनी सांगितले, की लोक या ठिकाणी येऊन खुलेआम किस करायचे. स्थानिकांना आपल्या कुटुंबासोबत




सोसायटीत ये-जा करणे कठिण झाले होते. अगदी डोळे बंद करून लोकांना आपल्या घरात प्रवेश करावा लागत होता. त्यानंतर याच ठिकाणी 'NO KISSING ZONE' असे लिहिण्याचा निर्णय घेण्यात आला. असे लिहिल्यानंतर जोडपे येण्याचे प्रमाण खूप कमी झाले असे स्थानिकांनी सांगितले.

सोसायटीतील सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, या ठिकाणी येता-जाता कपल्स किस करताना दिसून येत होते. तक्रारी वाढल्यानंतर सोसायटीच्या सदस्यांनी व्हिडिओ रेकॉर्ड करून ते नगरसेवक आणि पोलिसांना पाठवले. पण, काहीच कारवाई झाली नाही. पोलिसांनी कारवाई केली नाही त्यामुळे देखील आम्हाला स्वतःच बोर्ड लावावा लागला आहे. सोसायटीचे चेअरमन आणि वकील विनय अनसुरकर सांगतात, की आम्ही कपल्सच्या विरोधात नाही, तर त्यांच्याकडून होणाऱ्या अश्लील चाळ्यांच्या विरोधात आहोत. सोसायटीमध्ये लहान-मोठे सगळेच लोक राहतात. सार्वजनिक ठिकाणी अश्लीलता एक गुन्हा आहे, तरीही पोलिस कारवाई करत नव्हते. त्यामुळे आम्हालाच बोर्ड लावावा लागला.